९८

१८९१५

इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या अनुसूचित जाती, विमुक्त जाती /भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक:इबीसी-२००३/प्र.क्र.४१७/मावक-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ३१ मार्च,२००५

वाचा :- १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक :इबीसी-१०९४/३२०३८/प्र.क्र.१०/मावक-२, दि.१२/१/९६.

प्रस्तावना :- मागासवर्गीय मुलींमध्ये ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती / भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) प्राथमिक शाळांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आढळून येते. या गळतीच्या कारणांची मिमांसा करता असे दिसून येते की, मुलींचे पालक शहरी व ग्रामीण भागातील असून त्यांना रोजगार करण्यासाठी बाहेर जावे लागते. कुटूंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे पालक मुलींना रोजगारासाठी मदत होईल म्हणून शेतावर व इतरत्र कामावर घेऊन जातात. परिणामी सदर गळतीचे प्रमाण जास्त दिसून येते. त्यामुळे मुलींना शिक्षण देण्याची प्रवृत्ती पालकांमध्ये नसते. ही मुलींची गळती रोखण्याच्या दृष्टीकोनातून शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इबीसी-१०९४/३२०३८/प्र.क्र.१०/मावक-२, दि.१२/१/९६ अन्वये इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या मागासवर्गीय मुलींना दरमहा रु.३० ( फक्त १० महिन्याकरिता )शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करणे तसेच योजनेच्या नांवात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :- याबाबत विचार करुन इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या मागासवर्गीय मुलींना ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) देण्यात येणाऱ्या दरमहा रु.३०/- या शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये वाढ करुन ती दरमहा रु.६०/- प्रमाणे देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. योजनेच्या नावात पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे. "इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या

याबाबत होणारा खर्च मागणी क्रमांक एन-४, "२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण ०१ - अनुसूचित जातींचे कल्याण- २७७ शिक्षण, जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने स्थानिक क्षेत्र, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०८) (०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने (२२२५ ०५४ ८) (वि.घ.यो.), ४१ सहाय्यक अनुदान (अर्थोपाय अग्रीमाशी समायोज्य)" व "२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण ०३ - मागासवर्गीयांचे कल्याण - २७७ शिक्षण, जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०३) (०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये सहाय्यक अनुदाने (२२२५ ०८९ ८) अर्थोपाय अग्रिमाशी समायोज्य, ४१ सहाय्यक अनुदाने" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन हा खर्च यासाठी प्रतिवर्षी करण्यात येणा-या मंजूर तरतूदींमधून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : १०९/०५/व्यय-१४, दिनांक २१/०२/२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(न. मा. शिलवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व समाज कल्याण अधिकारी (गट-अ), जिल्हा परिषद,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
उप अधिकारी (वीयुडी-५/व्यय-१४/अर्थोपाय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव (...)

# परिशिष्ट "अ"

शासन निर्णय क्रमांक इबीसी-२००३/प्र.क्र.४१७/मावक-२, दिनांक ३१ मार्च,२००५

## शिष्यवृत्ती योजनेची नियमावली

१ ही शिष्यवृत्ती योजना मान्यताप्राप्त शाळांतील इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गामध्ये शिकणा-या मागासवर्गीय (अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींसाठी आहे.।

२ ही योजना सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात येईल.

३ ही योजना गुणवत्ता शिष्यवृत्ती व्यतिरिक्त राहील.

४ या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींना उत्पन्नाची किंवा गुणांची अट राहणार नाही.

५ ही शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी ते ७ वी या वर्गामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींना दरमहा रु.६०/- (रुपये साठ फक्त) १० महिने याप्रमाणे मंजूर करण्यात येईल.

६ ही शिष्यवृत्ती दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या कालमर्यादेपूर्वीच म्हणजे जून ते मार्च या १० महिन्यांसाठी मंजूर करण्यात येईल.

७ ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागासवर्गीय ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

८ ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी सर्व मान्यताप्राप्त शाळांमधून मागासवर्गीय ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींची माहिती मागविण्यात येईल.

९ सदरहू शिष्यवृत्ती समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद मंजूर करतील.